POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१८१ ● मुंबई, सोमवार, ०२ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# अर्थसंकल्पात महाराष्ट्राला ₹.१०००००००००००००

## विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### महाराष्ट्रासाठी काय?

- महाराष्ट्र ग्रामीण रस्ते प्रकल्प : ३७८.३८ कोटी
- महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस प्रकल्प : १६७.२८ कोटी
- सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : २८३.७७ कोटी
- महाराष्ट्र टर्शरी केअर आणि वैद्यकीय शिक्षण विकास कार्यक्रम : ३८५.७८ कोटी
- उपसा सिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण : २०७.१० कोटी
- शेती आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : ६४६.२४ कोटी
- मानवी विकासासाठी कौशल्य आणि अप्लाईड नॉलेज प्रकल्प : ३१३.६५ कोटी
- जिल्ह्यांमध्ये संस्थात्मक संरचना क्षमतावृद्धीसाठी : २४०.९० कोटी
- मुंबई-अहमदाबाद हायस्पीड कॉरिडॉर : ६१०३ कोटी
- मुंबई मेट्रो : १७०२ कोटी
- एमयुटीपी ३ : ४६२ कोटी
- एमएमआरमध्ये ग्रीन मोबिलिटी : १५५.३२ कोटी
- समृद्धी महामार्गावर आयटीएस : ६८०.७९ कोटी
- पुणे मेट्रो : ५१७.७४ कोटी




■बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा अर्थसंकल्प मांडला. यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया दिलीय. निर्मला सितारमण यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे 1 लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना माध्यमांशी ते बोलत होते.

**काय म्हणाले मुख्यमंत्री ?**

शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ १ लाख कोटी असायची. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाया मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षात प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### अर्थसंकल्पातील महत्वाची घोषणा कोणत्या?

- केरळ, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशमध्ये दुर्मिळ खनिज उत्खनन सुरू करणार.
- भारताला औषध निर्मितीचे हब बनवू, बायोफार्मासाठी १०,००० कोटींची तरतूद
- पायाभूत सुविधा, एमएसएमई आणि उद्योगांना चालना देणार
- इलेक्ट्रॉनिक्स पार्ट्स - सेमी कंडक्टरसाठी ४०,००० कोटींची तरतूद
- सरकार दुर्मिळ रेअर अर्थ मॅग्नेट कॉरिडॉर तयार करणार
- जागतिक-मानक औषध नियामक स्थापन करेल
- सरकार तीन केमिकल पार्क उभे करणार
- आयात अवलंबित्व कमी करण्यासाठी केमिकल पार्क बांधले जातील
- जलमार्गाचे जाळे वाढवणार २०४७ पर्यंत १२ टक्क्यांनी वाढवणार
- सेमी कंडक्टरसाठी ४० हजार कोटी रुपयांची तरतूद करणार
- भारताला औषध निर्मितीचे हब बनवणार आहे
- बायोफार्मासाठी १०,००० कोटींची तरतूद
- शुगर आणि कॅन्सरचे औषधोपचार स्वस्त
- ७ हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर
- मुंबई- पुणे आणि पुणे-हैदराबाद नवे रेल्वे कॉरिडॉर
- २० नवे जलमार्ग बनवणार
- बॅंकिंग क्षेत्राच्या विकासासाठी नवी समिती

### शेतकऱ्यांसाठी कोणत्या घोषणा?

- नारळ संशोधन केंद्र स्थापन करणार- ३ कोटी शेतकऱ्यांना लाभ
- पशूपालन दुग्धव्यवसायासाठीचे अनुदान वाढवणार
- काजू, कोको ब्रँड जागतिक दर्जा मिळवून देणार
- शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न
- ५०० एकात्मिक मत्स्य केंद्र उभारणार
- कुक्कुटपालन अधिक मजबूत करणार
- चंदन, नारळ आणि काजू या पिकांना चालना देणार
- ईशान्य भारतात बदाम आणि शेंगदाण्याचे उत्पादन वाढवण्यावर सरकारचा भर
- आयातीवर अवलंबत्व कमी करणार
- मत्स्यवसायात महिलांचा सहभाग वाढवणार
- सागरी किनारपट्टी आणि इशान्येकडील शेतकऱ्यांना मदत करणार
- शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी नवे पर्याय तपासणार

### बजेटमधील केवळ 'त्या' एका घोषणेमुळे मार्केटमध्ये खळबळ; सेन्सेक्स २ हजार अंकांनी कोसळला

केंद्रीय अर्थसंकल्पातील एका घोषणेमुळे शेअर मार्केटमध्ये मोठी पडझड झाल्याचे पहायला मिळत आहे. अर्थसंकल्पात F&O अंतर्गत STT वाढवण्यात आला आहे. मागील अर्थसंकल्पातही तो वाढवण्यात आला होता. यावेळी तो ०.१ टक्क्यांवरून वाढवून ०.१५ टक्के करण्यात आला आहे. या घोषणेनंतर शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळत आहे. सेन्सेक्समध्ये २००० अंकांची घसरण झाली आहे, तर निफ्टी ७०० अंकांनी घसरून व्यवहार करत आहे. कॅपिटल सेक्टरमध्येही मोठी पडझड झाली आहे. इरए, Groww सारख्या शेअर्समध्ये हाहाकार उडालेला दिसत आहे. तसेच वेदांता, हिंदुस्थान झिंक आणि हिंदुस्थान कॉपर मध्ये मोठी घसरण पाहायला मिळत आहे. निफ्टी २४,८०० च्या खाली; तर सेन्सेक्स ८०,५०० च्या खाली व्यवहार करत आहे. बीएससी टॉप ३० शेअर्सपैकी केवळ 3 शेअर्समध्ये तेजी आहे, तर २७ शेअर्स घसरणीसह व्यवहार करत आहेत. सनफार्मा, टीसीएस आणि कोटक महिंद्रा सोडून बाकी सर्व शेअर्स सुमारे ८ टक्क्यांपर्यंत तुटले आहेत. ऑटो, फार्मा आणि एफएमसीजी, बँक सेक्टरसह सर्वच सेक्टरमध्ये घसरण आहे. पीएसयु सारख्या सेक्टरमध्येही दबाव असल्याचं पहायला मिळत आहे.

## मिरा-भाईंदर, वसई-विरारमध्ये

### २०२५च्या वर्षभरात नव्वद टक्के गुन्हे उघडकीस




■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा -भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाची सुरुवात होऊन चार वर्षे पूर्ण झाली आहेत. आयुक्तलयाच्या हद्दीत २०२५ या वर्षात अनेक गुन्हे दाखल आहेत. त्या गुन्ह्यांपैकी बलात्कार, दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, जुगार, दारूबंदी,एन. डी.पी.एस.यांसारखे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. २०२५ या पूर्ण वर्षात ६६२५ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ५९३५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून त्याचे प्रमाण ९०% आहे .२०२४ या वर्षात गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ८८% होते म्हणजेच २०२५ मध्ये गुन्हे उघडकीस आणण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालाच्या हद्दीमध्ये खून,खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, चैन स्नॅचिंग, गर्दी मारामारी, दुखापत, बलात्कार, विनायभंग, महिलांना/तरुणींना छेड करणे, अत्याचार, मारहाण अशे अनेक प्रकारचे गुन्हे पोलीस ठाण्यात दाखल आहेत.पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी दाखल असलेले जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणत आरोपींना अटक केली असून त्यांना शिक्षा देखील झाली आहे.

पोलीस आयुक्तांनी आयुक्तलयाचा पदभार घेतल्यापासून महिला व तरुणी यांच्या सुरक्षतेसाठी अनेक पाऊले उचलली असून त्यात पेट्रोलिंग,११२ हेल्पलाईन,भरोसा सेल, तक्रार निवारण दिन, पूर्ण धैर्य योजना, दामिनी पथक यांचा समावेश आहे. मिरा-भाईंदर शहराची वाढती लोकसंख्या व महिला हिंसाचार / कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या तक्रारीना प्राधान्य देणे, त्यांना समुपदेशन करून मानसिक आधार देणे व त्यांच्या तक्रारीचे निवारण करणे याकरीता भरोसा सेलची स्थापना करण्यात आली.

## बॉलिवूडमध्ये भीतीचं सावट! रोहित शेट्टीच्या घरावर गोळीबार

■मुंबई। प्रतिनिधी,

सिंघम, गोलमाल अशा अनेक प्रसिद्ध चित्रपटांचे निर्माते आणि दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या जुहू येथील निवासस्थानी काल रात्री झालेल्या गोळीबाराने मुंबई हादरली आहे. पडद्यावर आपल्या चित्रपटातून गुन्हेगारांना सळो की पळो करुन सोडणाऱ्या शेट्टींच्या घराला खऱ्या आयुष्यात अज्ञात बदमाशांनी लक्ष्य केले. या खळबळजनक घटनेनंतर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, मुंबई पोलीस आणि क्राइम ब्रँचने तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत.

**पोलिस तपास काय सांगतो ?**

घटनेची माहिती मिळताच मुंबई पोलिसांचे उच्चपदस्थ अधिकारी आणि मुंबई गुन्हे शाखेची पथके घटनास्थळी दाखल झाली. सुरक्षेच्या कारणास्तव संपूर्ण परिसराची नाकेबंदी करण्यात आली आहे. हल्लेखोरांच्या पळण्याच्या मागाचा शोध घेण्यासाठी पोलीस 'शेट्टी टॉवर' आणि आसपासच्या इमारतींमधील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. तसेच, फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या पथकाने घटनास्थळावरून गोळ्यांच्या रिकाम्या पुंगळ्या आणि इतर पुरावे गोळा केले आहेत. मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी या वृत्ताला दुजोरा दिला असून, इमारतीवर गोळीबार झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. सध्या मुंबई पोलीस आणि गुन्हे शाखा या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.



### मध्यरात्री घुमला 'शेट्टी टॉवर'

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवार आणि रविवारच्या दरम्यानच्या रात्री साधारण 12.30 ते 1 च्या सुमारास घडली. जुहूच्या उच्चभ्रू भागातील 'शेट्टी टॉवर'मध्ये सर्व काही शांत असताना अचानक गोळ्यांच्या आवाजाने शांतता भंग झाली. हल्लेखोर किती संख्येने होते आणि कोणत्या वाहनाने आले होते, हे अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही. मात्र दहशत पसरवण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट होता. गोळीबार केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाले.

## वसईतील बंद पाण्याच्या टाकीत मानवी सांगाडा अन् कवटी आढळली

■वसई। प्रतिनिधी,

वसईत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. माणिकपूर पोलीस ठाणे नौपाडा परिसरात एका पाण्याच्या टाकीमध्ये मानवी शरीराचे अवशेष आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. हा धक्कादायक प्रकार नौपाडा येथील बारकुल्या नावाच्या चाळीत शनिवारी सायंकाळी घडल्याचं चित्र आहे. घटनेची माहिती मिळताच माणिकपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत शोध घेण्यास सुरुवात केली. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

**सांगाड्याचे काही तुकडे शोधण्याचे काम सुरु**

या प्रकरणात माणिकपूर पोलिसांना घटनास्थळी बोलवण्यात आलं. पोलिसांनी फॉरेन्सिक टीमला घटनास्थळी प्राचारण करण्यात आले होते. त्याच सांगाड्याचे इतर काही तुकडे शोधण्याचे काम पोलिसांना करावं लागत आहे. काहींनी अंधश्रद्धेचा अंदाज असल्याचं वक्तव्य केलं होतं. तर काहींनी खून करून मृतदेह टाकीत ठेवल्याचा देखील अंदाज बांधला. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे. या प्रकरणात नेमकं काय सत्य समोर येईल पोलीस त्याचा तपास करत आहेत.

घटनास्थळी शरीराचे पूर्ण अवशेष नसल्याने हा खून आहे की, आणखी काही असा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतल्याचं वृत्त आहे. या घटनेनं घटनास्थळ हादरून गेला आहे. पोलीस पुरेपूर तपास करून घटनेचा छडा लावतील.



### मानवी हाडांचा सांगाडा, कवटी टाकीत आढळली

दरम्यान, हि चाळ सुमारे तीस वर्षे जुनी आहे. याच चाळीत सुमारे दहा ते पंधरा कुटुंब वास्तव्यास आहेत. या चाळातील बंद पाण्याची टाकी अनेक वर्षांपासून वापरात आली नव्हती. इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु असताना पाण्याची टाकी तोडण्याचे काम सुरु होते, त्याचवेळी मानवी हाडांचा सांगाडा, कवटी त्या टाकीत आढळून आला होता.

## बनावट नोटांचे केज कनेक्शन!

### चक्क माजी सरपंच अडकला तामिळनाडूतील बनावट नोटांच्या रॅकेटमध्ये...



### पोलिसांनी आरोपींना घेतलं ताब्यात

संबंधित प्रकरणाची माहिती मिळताच तामिळनाडू पोलिसांनी त्यांची कार चेकपोस्ट अडवून कारची झडती घेतली. त्यात पोलिसांना २०० रुपयांच्या नोटांची ४१ बंडले सापडली. त्यानंतर, प्रकरणाचा गांभार्य लक्षात घेऊन त्वरीत सीआयडीकडे याचा तपास सोपवण्यात आला. पोलिसांनी रमेश भांगे आणि नारायण राम यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून दोन्ही आरोपींनी थुवकुडीपूर्वी मदुराई, पुदुक्कोट्टई आणि तंजावर भागातही बनावट नोटा चलनात आणल्याची माहिती पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आली.

■बीड। प्रतिनिधी,

रोहिदास हातागळे: तामिळनाडूतील बनावट नोटांच्या रॅकेटमध्ये बीडच्या केज तालुक्यातील माजी सरपंचासह एका व्यापाराचा सहभाग असल्याची बातमी समोर आली आहे. तामिळनाडू पोलिसांनी या प्रकरणात कारवाई करत केज तालुक्यातील डोका गावच्या माजी सरपंचासह एका व्यापाराला ८ लाख ३७ हजार रुपयांच्या बनावट नोटांसह अटक केल्याची माहिती आहे. तामिळनाडूच्या तिरुचिरापल्ली जिल्ह्यात थुवकुडी पोलिसांनी २१ जानेवारी रोजी ही कारवाई केल्याचं वृत्त आहे.

**पेट्रोल पंपावर बनावट नोटा दिल्या अन्...**

केज तालुक्यातील डोका गावचे माजी सरपंच रमेश बाबुराव भांगे (५४ वर्षे) आणि व्यावसायिक नारायण राम (३४ वर्षे) हे दोघे कार नंबर (एम एच- ४४/ झेड-२३८३) मधून तामिळनाडू राज्यात गेले होते. २१ जानेवारी रोजी तिरुचिरापल्लीतील थुवकुडी येथील पेट्रोल पंपावर त्यांनी इंधन भरलं आणि इंधन भरल्यानंतर त्या पेट्रोल पंपावर त्यांनी बनावट नोट दिली होती. आपल्याला बनावट नोटा दिल्याचं पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांच्या लक्षात आलं आणि याची जाणीव होताच त्यांनी तातडीने स्थानिक पोलिसांना याची माहिती दिली.

आरोपींनी आणखी कुठे कुठे बनावट नोटा चलनात आणल्या? बनावट नोटा कुठून आणल्या आणि त्या कुठे छापल्या गेल्या? तसेच या नोटांचे तामिळनाडू कनेक्शन काय आहे? याचा तपास सुरू असल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, बनावट नोटांच्या रॅकेटमुळे बीड जिल्हा आणि केज तालुका पुन्हा चर्चेत आल्याचं पाहायला मिळतंय.

### पैशांचं अमिष दाखवून फसवणूक

एकनाथ शिंदे गटाच्या प्रचारासाठी संभाजीनगरवरून साताऱ्यात आणण्यात आल्याचं सांगत महिलांनी आरडाओरड सुरु केली. काही महिलांनी आरोप केली की, सात ते आठ दिवसांच्या मोचार्साठी प्रत्येकी एक हजार रुपयांचं आमिष दाखवण्यात आलं. मात्र, साताऱ्यात पोहोचल्यानंतर ज्यांनी बोलावलं ते फोन उचलत नसल्याने अस्वस्थता निर्माण झाली.

### महिलांचा नेमका आरोप काय?

छत्रपती संभाजीनगरहून आल्याचं महिलांनी सांगितलं. एकनाथ शिंदे गटाच्या एका मोचार्साठी बोलावण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. पुढं त्या म्हणाल्या की, 'सकाळपासून आम्ही इथे उपाशी बसलोय. कोणीच घ्यायला आलेलं नाही. फोनही उचलत नाहीत.' दरम्यान, या प्रकारानंतर शिवसेना महिला पदाधिकारी बर्गे यांनी महिलांची भेट घेत, आमच्या पक्षाची बदनामी करू नका असं सांगितलं. तसेच शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडून अधिकृतपणे खुलासा करण्यात आला असून, संभाजीनगरवरून साताऱ्यात या महिलांना आणण्यात आमच्या पक्षाचा कोणताही संबंध नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.

## शिंदे गटाच्या प्रचाराला बोलवलं, पण झाली फसवणूक

### छत्रपती संभाजीनगरच्या महिलांसोबत साताऱ्यात काय घडलं?




■सातारा। प्रतिनिधी,

साताऱ्यात प्रचाराच्या नावाखाली महिलांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. छत्रपती संभाजीनगरवरून साताऱ्यात तब्बल २६ महिलांना एका अज्ञात इसमाच्या फोनवरून आणण्यात आलं. मात्र सकाळी सात वाजल्यापासून दुपारी दोन वाजेपर्यंत त्यांना घेण्यासाठी कोणीच न आल्याने या महिला सातारा एसटी बस स्थानकात उपाशीपोटी बसून होत्या. अखेर संताप अनावर झाल्यानंतर महिलांनी बस स्थानकातच आरडाओरडा सुरू केला. या महिलांचा आरोप आहे की, आम्हाला एकनाथ शिंदे गटाच्या प्रचारासाठी संभाजीनगरवरून साताऱ्यात आणण्यात आलं.

## परदेशातून आलेल्या महिलेला मुंबईत फसवलं... बनावट पोलिसांनी ६६ लाख लुटले




■मुंबई। प्रतिनिधी,

परदेशातून मुंबईत आलेल्या एका २६ वर्षीय तरुणीकडून बनावट पोलीस अधिकाऱ्यांनी तब्बल ६६ लाख रुपयांहून अधिक रक्कम लुबाडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणातील ४८ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, सुरेश रंगनाथ चव्हाण अशी आरोपीची ओळख समोर आली असून त्याला बुधवारी (२८ जानेवारी) त्याच्या ठाण्यातील घरातून ताब्यात घेण्यात आलं. या घटनेतील त्याचा एक साथीदार फरार असल्याचं सांगितलं जात आहे.

**पोलिसांचा तपास**

संबंधित तरुणीने आरोपींविरुद्ध माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आणि तिच्या तक्रारीच्या आधारे, भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांनी टेक्निकल तपासासाठी एक विशेष पथक तयार केलं आणि ३० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज स्कॅन केल्यानंतर, ठाण्यातील आझाद नगर येथून आरोपी चव्हाणला अटक केल्याचं सांगितलं जात आहे.

पोलिसांनी आरोपीकडे असलेली ७९.३५ जप्त केल्याची माहिती आहे. अधिकाऱ्यांनी या प्रकरणाबाबत दिलेल्या माहितीनुसार, आरोपीकडून जप्त केलेली रक्कम ही तरुणीने तक्रारीत सांगितलेल्या रकमेपेक्षा जास्त आहे. हे अतिरिक्त पैसे इतर कोणत्या अशाच गुन्ह्यांशी संबंधित आहेत का? याचा देखील तपास सुरू असल्याचं सांगण्यात येत आहे. तसेच, गुन्ह्यात वापरलेली बाईक देखील जप्त करण्यात आली आहे.

### ६६.४५ लाख रुपये असलेल्या बॅग्स चोरल्या...

संबंधित घटना ही २१ जानेवारी रोजी एम. जी. रोडवरील अलाना सेंटर बिल्डिंगजवळ घडली. मूळ केनिया देशाची रहिवासी असलेली 26 वर्षीय सुमय्या मोहम्मद अब्दी मुंबईत टॅक्सीने प्रवास करत होती. त्यावेळी, पोलीस अधिकारी असल्याचा दावा करणाऱ्या दोन पुरुषांनी तिची गाडी रोखली. तपासणीच्या बहाण्याने त्या आरोपींनी तिच्याकडील ६६.४५ लाख रुपये रक्कम असलेल्या दोन बॅग्स आपल्या ताब्यात घेतल्या. त्यानंतर, त्या दोघांनी महिलेला पुढील चौकशीसाठी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये येण्यास सांगितलं आणि अचानक बाईकवरून तिच्या पैशांनी भरलेल्या बॅग्स घेऊन ते फरार झाले.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# पुन्हा कमंडल विरुद्ध मंडल नको




शाळा-कॉलेजचे दिवस म्हणजे करियरला नवे दिशा देणारे, स्वप्नांना आकार देणारे, त्यातही सर्वात महत्त्वाचे म्हणजे आयुष्याला नवे वळण देणारे दिवस. शाळा-कॉलेजच्या उमलत्या वयात होणारी मैत्री आयुष्यभर टिकते, असे म्हणतात. कारण या मैत्रीला जातीभेद, गरीब-श्रीमंत, रंगरुप अशा कुठल्याही भेदभावाची किनार नसते. असते ती निखळ मैत्री. यातूनच पुढे समानतेच्या पार्यया चढणारा समाज घडत असतो. अर्थात देश स्वतंत्र होऊन तसेच संविधानातील समानतेची तत्त्वे लागू होऊन ७५ वर्षे उलटून गेली, तरी आपण समाजाला जातीयतेपासून पूर्णपणे मुक्त करू शकलो नाही. आयुष्याच्या अनेक टप्प्यांवर प्रत्येकाला कधी ना कधी भलेही तो स्वतः जातीभेद पाळत नसला, तरी जात आधारित व्यवस्थेशी किंवा जातीयतेची मानसिकता असलेल्या लोकांशी सामना करावा लागतोच लागतो. निवडणुका जवळ आल्या की देशाच्या कुठल्या ना कुठल्या कानाकोर्पयात जातीव्यवस्थेशी निगडित प्रश्न उचल खातात. कुठे आरक्षणावरून आंदोलने छेडली जातात, कुठे उपोषण केले जाते तर कुठे सत्ताधारी-विरोधक आमने सामने येतात. भारतात सर्वकाळ सर्वकाही आलबेल चालणे अशक्यच. तरी देशाच्या आर्थिक सुधारणांकडे त्यातही येत्या अर्थसंकल्पाकडे सर्वांचे लक्ष लागलेले असतानाच भारतीय अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नव्या वादग्रस्त नियमांमुळे दलित-सवर्ण विद्यार्थी आमने-सामने आलेत. एवढेच नाही, तर यूजीसीच्या या नियमामुळे समाज म्हणून आपण आणखी मागे जात आहोत का? असा गंभीर प्रश्न उपस्थित होण्यास कारण मिळाले आहे. उत्तर भारतात या वादग्रस्त नियमावरून रान पेटले आहे. पालक-विद्यार्थी, विविध विद्यार्थी संघटना-संस्था रस्त्यावर उतरून या कायद्याला तीव्र विरोध करत आहेत. उत्तर प्रदेशच्या बरेलीचे सिटी मॅजिस्ट्रेट अलंकार अग्निहोत्री यांनी यूजीसीच्या या नवीन नियमांच्या विरोधात आपल्या पदाचा राजीनामा देताच उत्तर प्रदेशसह संपूर्ण देशात यूजीसीचे नवीन नियम चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. हे नियम खरोखरच संविधानाच्या समानतेच्या तत्त्वाविरोधात आणि भेदभाव करणारे आहेत का? प्रयागराज माघ मेळ्यातील शंकराचार्यांच्या शिष्यांशी झालेल्या गैरवर्तनाचा या नियमांशी नेमका काय संबंध आहे? सवर्ण समाजाच्या आणि सामान्य श्रेणीतील विद्यार्थ्यांना या नव्या नियमाचा फटका कसा बसू शकतो आणि त्यांच्या तक-ारी आहेत तरी काय? अशा एक ना अनेक प्रश्नांची घुसळण सध्या सुरू आहे. हैदराबाद विद्यापीठात पीएचडीचे शिक्षण घेर्णाया रोहित वेमुलाने जातीय भेदभाव, जातीय टिकाटिप्पणीने त्रस्त होऊन २०१६ साली आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले होते. रोहितच्या आत्महत्येने देशभरात एक मोठी खळबळ उडवून दिली, ज्याचे पडसाद पुढील दशकापर्यंत न्यायालये, संसद आणि विद्यापीठांच्या आवारात उमटत राहिले. रोहितच्या आत्महत्येनंतर ३ वर्षांनी २०१९ म्हणजे मुंबईच्या नायर वैद्यकीय रुग्णालयात पायल तडवी नावाच्या वैद्यकीय शिक्षण घेर्णाया तरुणीवरही जातीय भेदभावामुळे आत्महत्या करण्याची पाळी ओढावली होती. या दोन मुख्य घटनांसह मागच्या दहशकभरातील इतरही काही घटनांचा हवाला देत सर्वोच्च न्यायालयाने शैक्षणिक व्यवस्थेतील जातीय भेदभावाला आळा घालण्यासाठी व्यवस्था तयार करण्याचे निर्देश केंद्र सरकार, यूजीसीला दिले होते. त्याचा परिपाक म्हणजेच यूजीसीने लागू केलेला समानता नियम २०२६. उच्च शिक्षण घेत असताना राखीव कोट्यातून निवड झालेल्या किंवा मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थिनींवर जातीय शेरेबाजी करणे, त्यांना दुय्यम-अपमानास्पद वागणूक देणे किंवा रॅगिंगसारख्या प्रकारातून शारीरिक-मानसिक छळवणूक करण्याचे प्रकार वर्गात, कॅम्पसमध्ये अथवा वसतिगृहात चालत असतात. या प्रकारांना आळा घालण्यासाठी हे नियम तयार केल्याचा तज्ज्ञांचा दावा असला, तरी सवर्ण व खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा या नियमांवर आक्षेप आहे. या नियमांतर्गत एखाद्या विद्यार्थी-विद्यार्थिनीने तक-ार नोंदवल्यास समानता समिती २४ तासांत बैठक घेईल आणि समानता पथक १५ दिवसांत तपास करून समितीला अहवाल देतील, या अहवालावर ७ दिवसांत कारवाई केली जाईल. दोषी विद्यार्थ्यावर परीक्षा देण्यास बंदी घातली जाईल अथवा त्याची पदवी रोखली जाईल, संबंधित शिक्षण संस्था किंवा विद्यापीठ जातीय भेदभावाचे प्रकार रोखण्यास अपयशी ठरल्यास त्यांचे अनुदान रोखले जाईल किंवा त्यांचा परवाना रद्द केला जाईल. समानता हेल्पलाईनच्या माध्यमातून विद्यार्थ्यार्ला तक्रार करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिवाय त्याच्या मदतीसाठी समानता दूतही असेल. या सर्व तरतुदी सवर्ण व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या आहेत, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या तरतुदी केवळ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाच केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये सवर्ण व खुल्या प्रवगार्तील विद्यार्थ्यांचा कुठेही विचार करण्यात आला नसल्याचा दावा या याचिकेतून करण्यात आला आहे. मागासवगार्तील विद्यार्थ्यांनी सवर्ण/खुल्या वगार्तील विद्यार्थ्यांवर अन्याय केल्यास, मागास वर्गातील विद्यार्थ्यांनी एकमेकांवर शेरेबाजी केल्यास किंवा सवर्ण/खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांवर खोटे आरोप लावल्यास काय करणार? कौटुंबिक हिंसाचार, अॅट्रोसिटीच्या काही प्रकरणांमध्ये अशी उदाहरणे समोर आली आहेत, त्यातही महत्त्वाचे म्हणजे या नियमांमुळे कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांचे दोन गट पडण्याची व खुल्या/सवर्ण वर्गातील विद्यार्थ्यांचे रॅगिंग होण्याची शक्यता वाढल्याचा दावाही याचिकेतून करण्यात आला आहे. तूर्तास तरी सर्वोच्च न्यायालयाने या नियमांमध्ये अधिक स्पष्टता येण्याची गरज असल्याचे म्हणत स्थगिती आणली आहे. तज्ज्ञांची समिती या नियमांची पडताळणी करून मध्यममार्ग काढेल, अशी अपेक्षा आहे. परंतु या निमित्ताने कॅम्पसमध्ये उगीचच जातीयतेच्या विषयाला शिरकाव करण्यास संधी मिळाली, हे चुकीचे झाले. नियम असे असावेत ज्यातून जातीयतेऐवजी समानतेला प्रोत्साहन मिळून शैक्षणिक संस्थांमधून सुजाण भारतीय नागरिक बाहेर पडतील. शैक्षणिक कॅम्पसमध्ये नियमांच्या नावाखाली कमंडल विरुद्ध मंडलसारखे शिरणारे राजकारण नव्या पिढीच्या भविष्यासाठी धोक्याचे ठरेल.

# कार्यकर्त्यांचा आधार, विकासाची दिशा

**महानगरपालिका निवडणुकांच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाने ह्यकार्यकर्ता हाच आधार आणि विकास हीच दिशाह्ण हा विचार प्रत्यक्ष कृतीतून मांडला. सामान्य, निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी देत विकासकेंद्रित राजकारणाचा नवा आदर्श ठेवला आहे.**



यावेळची महानगरपालिकांची निवडणूक अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. ५ वर्षांची नियत मुदत संपून ४ वर्षे झाल्यानंतर या निवडणुका होत असल्याने महानगरांमधील सर्व पक्षांच्या सामान्य कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आढळून आला. हा लेख लिहीत असताना या निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहचला होता. या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांबद्दल प्रसार माध्यमांमधून बरीच उलटसुलट चर्चा झाली. या गदारोळात भाजप नेतृत्वाने अनेक सामान्य स्थितीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली याकडे प्रसार माध्यमांनी लक्ष दिले नाही. अशा कार्यकर्त्यांना मी भेटून आलो. त्यांची स्थिती प्रत्यक्ष पाहिली. भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व तळागाळातील कार्यकर्त्यांना शोधून शोधून संधी देतो हे यातून सिद्ध झाले. पक्षनेतृत्वाला प्रत्येक इच्छुकाला उमेदवारी देता येत नाही, हे इच्छुकांनाही माहीत असते. कार्यकर्त्यार्ने लोकसभा, विधानसभा निवडणुकीत पक्षाचे काम प्रामाणिकपणे केले असते. त्याशिवाय वर्षभर सामान्य माणसाच्या अनेक छोट्या-मोठ्या तक्रारी सोडविण्याचे कामही कार्यकर्ते करत असतात. भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. बूथ पातळीवर काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा असतात. पक्षनेतृत्वाच्या मयार्दा जाणून घेऊन अनेकांनी पक्षाचा निर्णय आनंदाने स्वीकारला. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी आपल्या भावना जाहीरपणे व्यक्त केल्या ही गोष्ट मान्य करावी लागेल. ज्या कार्यकर्त्यांना राजकारणाचा कोणताही वारसा नाही, ज्यांच्याकडे उत्पन्नाची साधने अत्यंत मर्यादित आहेत, पण पक्षनिष्ठा हे ज्यांचे एकमेव भांडवल आहे अशा कार्यकर्त्यांना पक्षनेतृत्वाने मोठ्या प्रमाणात संधी दिली आहे. वसई-विरार महापालिकेच्या वॉर्ड क्रमांक १७ मध्ये शरद सुर्वे हे गेली अनेक वर्षे पक्षकार्य करीत आहेत. यावेळी त्यांनी उमेदवारीसाठी इच्छा व्यक्त केल्यानंतर प्रारंभी स्थानिक नेतृत्वाने उमेदवारी देणे अवघड असल्याचे त्यांना कळविले होते. अंतिम उमेदवार निवडताना मात्र सुर्वे यांना संधी देण्यात आली. पुणे महापालिकेत स्वच्छता कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या मुलाला पक्षाने संधी दिली आहे, अमर आवळे असे या कार्यकत्यार्चे नाव आहे. नाशिकमध्ये खासगी कंपनीत काम करणाऱ्या मकरंद वाघ यांनाही पक्षाने संधी दिली. तीच गोष्ट ठाणे येथील उषा वाघ यांची आहे. पावसाळ्यात घर गळू नये म्हणून घरावर प्लास्टिकची ताडपत्री टाकलेली, अशा घरात राहणाऱ्या उषा विशाल वाघ या निष्ठावंत या एकाच निकषावर पक्षाच्या उमेदवार बनल्या आहेत. राजकारण आणि निवडणुका म्हणजे श्रीमंताचे काम, फार्महाऊस, बंगले असणाऱ्यांनीच निवडणुका लढवायच्या असे चित्र निर्माण केले जात असताना उषा वाघ, अमर आवळे यांसारख्या सामान्य आर्थिक स्थितीतील कार्यकर्त्यांना भारतीय जनता पक्षाने आवर्जून उमेदवारी दिली आहे. १९८० आणि १९९० च्या दशकात भारतीय जनता पक्षाचे काम करणे ही सामान्य कार्यकर्त्यांसाठी प्रचंड अवघड गोष्ट होती. त्या प्रतिकूल स्थितीतही पक्षाची विचारधारा जपण्यासाठी कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्या खपल्या आहेत. या कार्यकर्त्यांचे पक्षनेतृत्वाला कधीच विस्मरण होणार नाही. या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय जनता पक्षाने ही निवडणूक संपूर्णपणे विकासाच्या मुद्द्यावर लढवली. राजकीय टीका-टिप्पणी करण्यापेक्षा भारतीय जनता पक्षाने सत्तेत असताना काय केले आणि या पुढील काळात आम्ही काय करू इच्छितो, हे प्रचार सभांमधून सांगण्यावर भाजप नेतृत्वाने भर दिला. महानगरांचे वाढते स्वरूप लक्षात घेऊन भविष्यकाळातील महानगरांच्या गरजा ओळखून कोणकोणत्या सुविधांना प्राधान्य देणे गरजेचे आहे आणि वेगवेगळे नागरी प्रश्न, समस्या केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकायार्ने कशा सोडविता येतील, या विषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या प्रचार सभांमधून भाष्य केले. भारतीय जनता पक्षाने प्रत्येक महापालिकेसाठी स्वतंत्र जाहीरनामा प्रकाशित केला. प्रत्येक महापालिकेचे प्रश्न, नागरी समस्या यांचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यानुसार प्रत्येक महापालिकेसाठी स्वतंत्र जाहीरनामा तयार करण्यात आला. २०१४ पासून भारतीय जनता पक्ष केंद्रात सत्तेत आहे. राज्यात २०१४ पासून अडीच वर्षांचा काळ सोडला तर भाजप सत्तेत आहे. या काळात निवडणुका होत असलेल्या महापालिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारने काय केले, याचा हिशोब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचार सभांच्या माध्यमातून जनतेपुढे ठेवला.

# घातक पाणी



**इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. इंदूरनंतर महूतील घटना, प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.**

मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील जलसंकट आणि दूषित पाण्याची चर्चा सध्या देशभर आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलजन्य आजारांमुळे अनेक रुग्ण विशेषतः लहान मुले रुग्णालयात दाखल आहेत. ज्या शहराला स्वच्छतेबद्दल सातत्याने पुरस्कार मिळत आले आहेत, त्या राज्यातील लहान मुले दूषित पाण्यामुळे आजारग्रस्त आहेत, हे विदारक सत्य पाहायला मिळत आहे. महूमध्ये २२ जणांमध्ये काविळीची लक्षणे आढळून आली. वास्तविक कावीळ हा काही असाध्य आजार नाही. पण इंदूरच्या जलवाहिन्यांमध्ये असलेल्या प्रदूषणामुळे भयानक रोगाने पुन्हा डोकेवर काढले आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे काहीजण मृत्यूमुखी पडल्यावर महूतील घटना इंदूरची प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

महु येथे तर एक विहीर दूषित पाण्याने भरलेली आढळली. २४ हून अधिक नागरिक येथे आजारी पडले आणि आता या भागातील प्रशासनाने खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत. इंदूरच्या घटनेनंतर महु येथील घटना प्रशासनाला खडबडून जाग आणणारी ठरली आहे. पण यामुळे नागरिकांना पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यासाठी चांगले पाणी मिळेल का असा प्रश्न उभा राहिला आहे. इंदूर की महू असो की भारतातील कोणतेही लहान तालुकास्तरीय गाव असो, येथील नागरिकांना एका व्यापक सत्याला सामोरे जावे लागत आहे. ते म्हणजे स्वच्छ पाण्यापर्यंत पोहोच आणि सुरक्षा हे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. पण, नेमके तेच त्यांना मिळत नाही. केवळ नागरिकांना पाणी देण्यामुळे आरोग्यावर झालेले परिणाम सुधारणार नाहीत तर त्यासाठी स्वच्छ पाणी मिळणे तितकेच गरजेचे आहे. भारतात जे जलजन्य आजारांच्या साथी येत आहेत. त्यांना दुर्दैवी परंतु पृथक स्थानिक स्वराज्य संस्थांची ढिलाई म्हणून पाहिले जाते. स्थानिक अधिकाऱ्यांचे हे अपयश तर आहेच पण जुनाट पाइपलाइन आणि क्वचित गंजलेल्या पाइपमधून पाणीपुरवठा होत राहणे हेही या साथींचे कारण आहेच. भागीरथपुरा येथील दुर्घटना हे दर्शवते, की हा एक अपघात नव्हता तर संभाव्य दृश्य परिणाम होता ज्यात सरकारी कारभाराचे मॉडेल ज्यात केवळ दिखाऊ स्वच्छता आणि आकडेवारीने मूलभूत सार्वजनिक आरोग्य आणि लोकांना स्वच्छ पेयजल देण्याचे वचन पाळले गेले नाही. इंदूर शहरातील शोकांतिकेने एक प्रश्न निर्माण केला आहे तो म्हणजे नळातून जर सांडपाणी येत असेल तर शहराच्या स्वच्छतेला काय अर्थ?.

सरकारने टाकलेल्या जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. तसेच इंदूरमध्ये अतिसाराची साथ आली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला आहे. याचा अर्थ सरळ आहे. नगरपालिका प्रशासनाने यात कुचराई केली आहे. जलवाहिन्या गंजलेल्या आहेत आणि भगीरथपुरा येथील एक जलवाहिनी तर स्वच्छतागृहाच्या खाली दबलेली होती. महूमध्ये पट्टी बाजार आणि चंदन नगर येथे गळक्या पाइपलाइनमुळे काविळीची साथ पसरली, महुमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची जबाबदारी कटक मंडळ (कॅन्टोनमेंट बोर्ड)ची आहे. रहिवाशांना उकळून पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला. पण 'बैल गेला आणि झोपा केला' अशी ही स्थिती आहे.

कॅगने २०१९ च्या अहवालात ८.९५ लाख रहिवाशांना दूषित पाण्याचा पुरवठा केल्याचा ठपका ठेवला होता. तसेच पाण्याच्या नमुन्यांचे सर्वेक्षण न केल्याचा आरोपही करण्यात आला होता. हे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी अक्षम्य छेडछाड आहे असे नमूद करावे लागेल आणि त्याबाबत कुणालाही खंत नाही किंवा खेदही नाही ही बाब जास्त दुःखदायक आहे. अधिकाऱ्यांनी पाण्यामुळे होणाऱ्या आजाराची ५.४५ लाख प्रकरणे नोंदवली. पण त्यातही गंभीर बाब अशी की कॅगने आपल्या अहवालात पाण्याच्या चाचण्यांचा अभाव नोंदला आहे. त्यामुळे इंदूर किंवा महू किंवा मध्य प्रदेशात कुठेच पाणी दूषित आहे की नाही याची काहीच खातरजमा करता येत नाही.

आता हा दूषित पाण्याचा पुरवठा हा निश्चितच मध्यप्रदेशातील राजकीय पक्षांसाठी वादाचा मुद्दा बनला आहे. या मुद्यामुळे व्यापक पाण्याचा पेच तर ऐरणीवर आला आहेच पण काँग्रेस आणि भाजप यांच्यात जोरदार वाद रंगला आहे. काँग्रेसने या मुद्यावर व्यापक जनमोर्चे आयोजित केले तर भाजपने त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. वास्तव हे आहे की पाणी हा राजकीय मुद्दा आहेच. कारण पाण्यावरून लढाया होतील असे भाकीत वर्तवले होते. कोणतेही सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो, ते इतक्या अफाट लोकसंख्येला पुरेसे आणि स्वच्छ पाणी पुरवू शकत नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की इंदूर नगरपालिकेने केले ते योग्य केले. पण सरकारची क्षमता इतक्या लोकसंख्येला सुरक्षित पाणी पुरवण्याची नाही. यात राजकारण आणणे चुकीचे नव्हे तर निषेधार्ह आहे. मध्यप्रदेशात जे घडले किंवा घडत आहे ते सार्वत्रिक दृश्य आहे. त्यात नगरपालिका स्वच्छ पाण्याचा पुरवठा करत नसतील आणि त्यात काही अडचणी असतील तर त्यांना ती नगरपालिका जबाबदार आहे.




# मुंबईत पाय रोवून उभी असलेली मराठी भाषा!

**मुंबई मराठी साहित्य संघ आणि स्वामीराज प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी ३१ जानेवारी रोजी साहित्य संघ मंदिर गिरगाव येथे ४८ वे महानगर साहित्य संमेलन संपन्न होत आहे. 'मुंबई आणि मुंबईची लोकल' हा या संमेलनाचा विषय आहे. त्या पार्श्वभूमीवर मुंबईचे अभ्यास नितीन साळुंखे यांचा हा लेख. लोकल ट्रेनमध्ये मुंबईत मराठी भाषा शिल्लक आहे की नाही आणि कितपत आहे, याचा अंदाज बरोबर मिळतो. लोकल ट्रेनमध्ये अजूनही १० मधल्या ६ जणांच्या तोंडून मराठीच्या विविध बोली ऐकू येतात, ही समाधानाची बाब आहे.**

माझं आजवरचं संपूर्ण आयुष्य मुंबईतच गेलंय. मुंबईत सर्वच आधुनिक सुखसोयी (त्या त्या काळातल्या) सुरुवातीपासूनच उपलब्ध असल्याने, मुंबईत जन्मलेल्या आणि वाढलेल्या कोणत्याही मुंबईकराला मुंबई सोडून इतर प्रांतात जायची पाळी फारशी कधी येत नाही, त्यामुळे मुंबईबाहेरचं जग आणि तिथे राहणाऱ्या माणसांचं जगणं, त्यांचं सांस्कृतिक, सामाजिक व भाषाविश्व त्याला फारसं अनुभवायला मिळत नाही. इतर मुंबईकरांचं माहीत नाही, पण मला मात्र ही उणीव सातत्याने जाणवत राहाते.

मला विविध प्रांतातल्या भाषा आणि बोलींचं लहानपणापासून आकर्षण आहे. मुंबईत जन्म झाल्याने, कानावर सातत्याने पडत आलं ते मराठी. त्यातही मालवणी बोली प्रामुख्याने मी ऐकत आलो. त्यामागचं कारणही अगदी उघड आहे. १८५३ च्या एप्रिल महिन्यात मुंबईतली पहिली प्रवासी रेल्वे धावली आणि त्याच्या पुढच्याच वर्षी मुंबईतली पहिली कापड गिरणी सुरू झाली. या दोन महत्त्वाच्या घटनांनी भविष्यातल्या औद्योगिक मुंबईचा पाया घातला, असं सर्वसाधारणपणे म्हटलं जातं आणि त्यात तथ्यही आहे. प्रवासाची स्वस्त सोय आणि रोजगाराची हमी मिळाल्यानंतर देशभरातल्या श्रमिकांनी मुंबईचा रस्ता धरला. त्यातही सुरुवात झाली, ती कोकणातून...!

कोकण भौगोलिकदृष्ट्या मुंबईला जवळचं. किंबहुना मुंबई हा कोकणाचाच हिस्सा. त्यात रेल्वे अवतरण्यापूर्वीपासूनच कोकण मुंबईशी जलमार्गाने जोडलेलं असल्याने, मुंबईत पहिला कामगार अवतरला तो कोकणातून आणि मग त्यात सातत्याने वाढच होऊ लागली. हा कामगार येताना आपली भाषा तर घेऊन आलाच, परंतु संस्कृतीही घेऊन आला. आपापल्या गांव-शीववाल्यांच्या सोबतीने तो मुंबईत राहू लागला. त्यातून मालवणी, रत्नागिरीकर, चिपळूणकडचे बाले, आणि नंतर आलेले घाटावरचे घाटी अशा मराठी मातीतल्याच, परंतु विविध ठिकाणच्या लोकांच्या वस्त्या मुंबईत, त्याही गिरणगांवात होऊ लागल्या. माझं मूळ मालवणी मुलखातलं आणि मुंबईतलं आजोळ लालबागातलं असल्याने, माझ्या आजूबाजूला मालवणी बोलणारीच माणसं जास्त करून होती आणि परिणामी लहानपणापासूच ती बोली कानावर पडू लागली व मला आपोआप बोलता येऊ लागली..! तेव्हा मला मालवणी हीच मुंबईची भाषा आहे असं वाटायचं. म्हणजे हा पगडा एवढा होता की, एखादा घाटी स्वरात बोलू लागला की तो कुणीतरी वेगळा आहे, असं वाटायचं...!

पुढे थोडा मोठा झाल्यावर हिंदीची ओळख झाली. याचं श्रेय, अर्थातच, हिंदी सिनेमांचं. तरीही तोवर मुंबईतली सर्वसामान्य संपकार्ची भाषा विविध बोलींतील, परंतु मराठीच होती. येता-जाता रस्त्यात, दुकानांतून, रेल्वे-बसमधून प्रवास करताना मराठी कानावर पडणं अगदी सहजच होतं. अगदी गुजराती दुकानदार, फेरीवाले भैयाही मराठीतून बोलत असत. मराठीतून बोललेलं त्यांना व्यवस्थित समजतही असे. मुंबईतल्या व्यवहाराची भाषा मराठीच होती. अगदी पारसी, गुजराती गिरणीमालक आणि गिरण्यांमधे काम करणारे इतर भाषक अधिकारीही मोडकं-तोडकं का होईना, 'घाटी'भाषा बोलत असत (मराठीसाठी 'घाटी' असंच बोललं जाई तेव्हा). ही परिस्थिती गत शतकातल्या नवव्या दशकापर्यंत कायम होती.

९०च्या दशकात मुंबईतल्या कापड गिरण्या बंद पडल्या आणि मुंबईचा मराठी तोंडवळा हळूहळू बदलू लागला. मुंबईतलं मराठीपण टिकवून ठेवण्याचं मोठं श्रेय गिरण्या आणि त्यात तीन पाळ्यांत राबणाऱ्या गिरणी कामगाराचं होतं. तोच विस्थापित होऊ लागला आणि मुंबईतलं मराठीपण हरवू लागलं. गिरण्यांच्या जागी रोजगाराची नवनवीन साधनं उपलब्ध होऊ लागली आणि मुंबईत देशातील विविध भागांतून रोजगाराच्या शोधात येणाऱ्यांची संख्या वाढू लागली. प्रवासाच्या अधिक चांगल्या सोयी, कोणत्याही राबत्या हाताला काम मिळण्याची खात्री, तंत्रज्ञानात वेगाने झालेली प्रगती यात मराठी माणूस स्वतःला बसवू न शकल्याने, तो हळूहळू मुंबईच्या बाहेर फेकला जाऊ लागला. त्याचवेळेस मुंबईतील जागांचे भाव अस्मान छेदून जाऊ लागले. मुंबईतल्या लहान जागांना सोन्याचा भाव मिळू लागला आणि खोलीच्या एका खणात आपल्या मोठ्या कुटुंबासहीत राहाणारा मुंबईकर, मुंबईच्या बाहेर भाईंदर-विरार आणि ठाण्याच्या पलीकडील डोंबिवली-कल्याणच्या प्रशस्त ब्लॉकात स्थलांतरित होऊ लागला. त्याच्या मुंबईतल्या एकखणी खोलीचा ताबा गुजराती-मारवाडी धंदेवाल्यांनी सहजपणे घेतला. मुंबई कॉस्मोपॉलिटन होऊ लागली आणि मुंबईतली आणि मुंबईची संपर्क भाषा हिंदी होऊ लागली किंवा झाली.

गुजराती भाषकांची संख्याही मुंबईत वाढू लागल्याने, गुजरातीही कानावर पडू लागली. गुजराती ही 'व्यापाराची' भाषा. मी काही काळ बँकेत नोकरी केली होती. बँकेचे बहुसंख्य 'कस्टमर' गुजराती असत, पण बँकेचा कारभार (आणि धोरणही) शंभर टक्के मराठी भाषेत होता. गुजराती ग्राहक आमच्याशी मराठीच, परंतु गुज्जू टोनमध्ये बोलत. ते 'गुर्जरी मराठी' ऐकायला वाटेही छान. ते आपसांत मात्र गुजराती भाषेत बोलत. त्यांचं बोलणं कानावर पडत असे. अंधेरीचा माझा शेजारही बराचसा गुजराती भाषक होता. त्यांचं बोलणं-कम-भांडणं सातत्याने कानावर पडत असल्यामुळे, मला सवयीने गुजराती समजूही लागलं होतं. गुजराती शेजारी आमच्याशी संपर्क साधताना मात्र आवर्जून मराठीत बोलत असत. पण पुढे पुढे ते आणि आम्हीही हिंदीचा आधार घेऊ लागलो. मुंबईतल्या बऱ्याच मराठी माणसांना उत्तम गुजराती बोलता येते. असं असलं तरी, सर्वसामान्यपणे मुंबईतली संपर्कभाषा हिंदी झाली होती.

मुंबईतली मराठी भाषा अंतर्प्रवाहाप्रमाणे टिकून राहिली, ती प्रामुख्याने सरकारी कार्यालयांतून, बीएसटीच्या बसमधून आणि पोलीस खात्यातून. सरकारी मराठी म्हणजे, उत्तम मराठी येर्णाया माणसाच्याही काळजात घडकी भरण्याचा प्रकार. ते नस्ती, कार्यात्मक प्राधिकार, ज्ञापन आणि असे अनेक विचित्र शब्द कानावर पडले की नको ते मराठी, त्यापेक्षा इंग्रजीच बरं अशी परिस्थिती होते. पण ही झाली सरकारी कागदावरची भाषा. सरकारी कार्यालयातील बोली मात्र सामान्य मराठीच होती. अजूनही आहे. सरकारी कर्मचारी-अधिकारी बोली भाषेतली मराठी बोलतात. बीईएसटीच्या बसमध्ये अजूनही मराठीचंच राज्य आहे. पोलीस खात्याशी सामान्य माणसांचा फारसा संबंध येत नाही (आणि येऊही नये. तिथे 'खलरक्षणाय सदनिग्रहणाय' हा प्रकार असतो), परंतु 'खाकी'ची बोली मात्र अस्सल गावरान मराठीच (शिव्यांसहीत) आहे.

वरील व्यवस्था वगळता मुंबईचं वैशिष्ट्य म्हणजे लोकल ट्रेन. ही धावती-'बोलती' लहानशी मुंबईच आहे. मुंबईच्या उत्तर दिशेला पश्चिम रेल्वेवर भाईंदर-विरार आणि मध्य रेल्वेवर कल्याण-डोंबिवली आणि त्याही पलीकडे एव्हाना बहुसंख्य मराठी माणूस विस्थापित झालेला आहे. या मुंबैकरांच्या निवासाचं ठिकाण तिकडे असलं तरी, त्याला नोकरी-व्यवसायानिमित्त अजूनही यावं लागतं, ते प्रामुख्याने मुंबईतच. सकाळी दक्षिण दिशेला ऑफिसात जाण्यासाठी आणि संध्याकाळी उत्तरेतल्या घराकडे परतण्यासाठी त्याच्या प्रवासाचं मुख्य साधन म्हणजे लोकल. मुंबईची ही लोकल गाडी मुंबईची नाडी आहे. ती मुंबई (करांच्या)च्या 'प्रकृती'चा अचूक अंदाज देते. मुंबई ओळखायची असेल, तर या लोकल गाडीतल्या 'फ्लोटिंग पॉप्युलेशन'चा कानोसा घ्यावा. या लोकलमधले आपापसातले वाद-संवाद आणि मोबाईलवरचं संभाषण ऐकताना जगात काय घडतंय आणि त्यातून काय निष्पन्न होणार हे इथे अगदी 'लाईव्ह' समजतं.

या लोकल ट्रेनमध्ये मुंबईत मराठी भाषा शिल्लक आहे की नाही आणि कितपत आहे, याचा अंदाज बरोबर मिळतो. माझं निरीक्षण आहे की, लोकल ट्रेनमध्ये अजूनही १० मधल्या ६ जणांच्या तोंडून मराठीच्या विविध बोली ऐकू येतात. लोकलमधला सहप्रवाशाशी होणारा संवाद किंवा वाद सुरू होताना हिंदीतच होतो. पण बऱ्याचदा होतं काय की, समोरचाही मराठी आहे याचा काही वेळातच अंदाज येऊन तो वाद-संवाद पुढे मराठीत सुरू होतो. मला तर प्रवासात हे अनेकदा जाणवलेलं आहे. हा 'प्रवासी मराठी माणूस' मुंबईतील आपापल्या कार्यालयातूनही मराठीत बोलताना मला अनेकदा आढळलेला आहे. आपण मराठीतून संवाद साधायचा प्रयत्न केल्यास, आपल्याला मिळणारा प्रतिसादही मराठीत असतो, हे देखील अनुभवायला येत असतं. मला तरी हे आश्वासक वाटतं.

मुंबईत कायमचा राहणाऱ्या मराठी माणसाचा टक्का घटला असला तरी, सकाळी साधारण १० ते संध्याकाळी ७-८ वाजपर्यंत मुंबईतला मराठी भाषेचा वावर बऱ्यापैकी असतो..! या वेळेव्यतिरिक्त ही मराठीची लेकरं लॉजिंग-बोर्डिंगचंच स्वरूप आलेल्या वसई-ठाणे खाडीपलीकडील साष्टीत आपापल्या घरट्यात जाऊन तिकडचा मराठी टक्का टिकवण्याचा प्रयत्न करत असतात..! मुंबईत मराठी टिकून आहे, ते आणखी एका ठिकाणी जाणवतं. डॉक्टरकडे. डॉक्टर गुजराती, मारवाडी, पंजाबी की आणखी कुणीही असो, तो तपासणीकरिता आलेला रुग्ण जर मराठी असेल, तर त्याच्याशी तो मराठीच बोलतो.

आजारपणात संबंध (आणि गाठही) थेट जीवाशीच असल्याने, खास मराठी भाषेतच (किंवा त्या त्या भाषेतच) वर्णन करता येतात असे काही जे आजार किंवा लक्षणं असतात, ती नीट कळण्यासाठी डॉक्टर्स पेशंटच्या भाषेचाच आधार घेतात. मराठी पेशंट असेल तर डॉक्टर्स आवर्जून मराठीतच बोलतात. यात तरुण-प्रौढ असे सगळेच डॉक्टर आले. वकीलबाबू मात्र इंग्रजीचा झगा उतरवायला सहसा तयार होत नाहीत. तरी कनिष्ठ न्यायालयात मात्र बऱ्यापैकी मराठीचा बोली कारभार चालतो. तिथले न्यायमूर्तीही मराठीत बोलतात आणि सामनेवाल्यालाही बोलू देतात.. एकूणच काय, तर मुंबईतला मराठी माणूस बऱ्यापैकी कमी झालेला आहे हे सत्य असलं तरी, त्याची भाषा असलेली मराठी मात्र अजूनही मुंबईत बऱ्यापैकी जम बसवून आहे, असं माझं अनुभवांती झालेलं मत आहे. हा जम अधिक घट्ट करण्यासाठी आपण आवर्जून मराठीत बोलायला मात्र हवं.

## ओपनफेस सँडविच

तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. खास करून मुलांच्या डब्यात काय पदार्थ द्यावे हे सुचत नाही. पोळीभाजी नको, पराठे खाऊन कंटाळा आला, सँडविच काय तेच तेच.. मग असे करायचे की हे पदार्थ वेगळ्या रूपात द्यायचे. आता सँडविच. नेहमीचे कसे असते, बटाटा, चटणी, काकडीबरोबर नाही का! मग सँडविचला वेगळे रूप द्यायचे. नेहमीचे सँडविच बंद असते, हे ओपनफेस ठेवायचे.



**साहित्य** – उकडलेला बटाटा, सिमला मिरची, गाजर, फरसबी, चाट मसाला, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू, ब्रेड, चिझ किंवा बटर.

**कृती** – उकडलेला बटाटा किसून त्यात हवी तर सिमला मिरची, गाजर, फरसबी काहीही घाला. मात्र अत्यंत बारीक चिरून. आता यात हवा तो मसाला टाका. चाट मसाला, ड्राय हर्ब्स, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू रस चांगले एकत्र केले की ब्रेडचे लांबट तुकडे करा. त्यावर हे मिश्रण थापा. वरून चीझ किसून घाला अथवा थोडे बटर घाला. साधारण ग्रील करा किंवा तव्यावर शेकवून द्या. हे सँडविच मेयो किंवा चटणीसोबत खायला द्या.

### वॅक्सिंगऐवजी शेव्हिंगचा पर्याय वापरत असाल तर या गोष्टी ठेवा लक्षात

# शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे

**आता लवकरच उन्हाळा सीझन सुरू होईल, समर वाइब्सनुसार आपणही शॉर्ट्स, क्युट ड्रेसेस घालून बाहेर पडण्याचा विचारात असाल, अशावेळी पायावर जाड केस असले तर असे कपडे कसे घालू? असा प्रश्नही तुम्हाला साहजिक पडेलच. मग अगदी आयत्या वेळी पार्लरमध्ये जाण्याऐवजी आपण घरीच रेझर घेऊन शेव्हिंगचा पर्याय निवडाल, वास्तविक यात काही हरकत नाही, मात्र अनेकदा शेव्हिंगमुळे पुन्हा अंगावर येणारे केस हे नियमित लवेपेक्षा जाडसर येतात आणि पुढच्या वेळी हेच केस पुन्हा काढून टाकताना त्वचेला त्रास होतो. असं होऊ द्यायचं नसल्यास तुम्हाला शेव्हिंगवेळी फक्त काही सोप्या टिप्स लक्षात ठेवण्याची गरज आहे. अनेक महिलांना वॅक्सिंगमुळे त्रास होतो, तर हेअर रिमूव्हल क्रीम्समुळे त्वचा काळवंडते, असाही काहींचा अनुभव असतो, यावर पर्याय म्हणून रेझरचा वापर हा त्यातल्या त्यात सेफ म्हणता येईल. फक्त रेझर योग्य पद्धतीने वापरला जातोय का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही योग्य पद्धत कोणती आणि शेव्हिंग करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायच्या, हे जाणून घ्या..**



**कसा वापराल रेझर?**

रेझर फिरवताना ज्या दिशेने केस येतात त्या दिशेनेच फिरवा, यामुळे केस मुळासकट निघून जायला मदत होते आणि पुढील वेळेस जाड केस येत नाहीत. रेझर फिरवताना दुखापत होईल इतका जोर लावू नका. हात, पाय, अंडरआर्म्स, गुप्तांग अशा सर्वच ठिकाणी एकच रेझर वापरू नका. ब्लेड चेंज करणारे रेझर वापरत असाल तर एखादे ब्लेड तीन ते जास्तीत जास्त चार वेळा वापरा. त्यावर नको. शेव्हिंग प्रोसेस सोपी करतील असे मार्ग -

"जो भाग शेव्ह करायचा आहे तो पाण्याने भिजवा यामुळे केस नरम होतील." हात किंवा पाय, अंडरआर्म्स, प्रायव्हेट पार्टवरील केस काढायचे असतील तरी आधी त्यावर कमी केमिकल्स असलेले शेव्हिंग फोम वापरा, मगच केसांवर रेझरचा वापर करा. यामुळे केस नरम होतात आणि पटकन निघून जातात." शेव्हिंग केल्यानंतर तुमच्या त्वचेची छिद्रे उघडतात. त्यात धूळ जाऊ नये किंवा कोरडेपणा येऊ नये, रेडनेसचा त्रास होऊ नये म्हणून चांगले मॉइश्चरायझर त्वचेला लावा." शेव्ह केल्यानंतर आधी तुम्ही तुमच्या अंडरआर्म्सला अ‍ॅलोवेरा जेल किंवा बर्फ लावा. बेबी पावडरने जळजळ होत असल्यास लगेच थांबते.



**आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी, आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थातच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यांमध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते. रिफाईन्ड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह, इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे.**

### मिठाई बनवताना साखरेऐवजी

# वापरा खजुराची पेस्ट



आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरूम, पुटकुळ्या येणे, इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.



खजुराची विशेषता अशी की त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत. शंभर ग्रॅम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेऐवजी वापरली जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी.

या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध, किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला वेगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत.

त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

**मनुके खाण्यास जेवढे स्वादिष्ट आहेत, तेवढेच अन्य ड्रायफ्रुटच्या तुलनेत स्वस्त देखील आहेत. मनुक्यांचा वापर अनेकदा गोड पदार्थांमध्ये केला जातो. याचा स्वाद पदार्थाला चवदार बनवतो. याव्यतिरिक्त मनुके खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे फायदे जाणून घेऊया...**

### जाणून घ्या फायदे

# मनुके खाण्याचे



**शरीराला ताकद मिळते –** दररोज मनुके खाल्ल्याने शरीराला ताकद मिळते. मनुक्यात नैसर्गिक साखर असते, जी सहज पचते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. मनुक्यात कोलेस्ट्रॉल नसते, ज्यामुळे हृदयाची समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे चांगले आहे.

**बद्धकोष्ठता असणाऱ्यांसाठी फायदेशीर –** जर तुम्हाला बद्धकोष्ठता असेल तर मनुके खूपच फायदेशीर आहेत. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी मनुके एकप्रकारचे वरदान आहे. मनुक्यांना भिजवून खाल्ल्याने अधिक फायदा होतो.

**वजन कमी करण्यासाठी –** मनुक्यातील नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला नुकसान पोहचवत नाही. यामुळे याचे नियमित सेवन केल्याने तुमचे वजन देखील कमी होते.

**हाडे मजबूत होतात –** हाडे मजबूत करायची असतील तर मनुक्यांचे सेवन नक्की करा. मनुक्यात कॅल्शियमचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे याचे सेवन दररोज करावे.

**तुमचा फोन चोरीला गेल्यास सर्वप्रथम तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा. तसेच मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट आणि मोबाईल वॉलेट ब्लॉक करा. फोन चोरी झाल्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करायला विसरू नका.**

# फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

हल्ली चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या अ‍ॅप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

**सिम कार्ड ब्लॉक करा**

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते अ‍ॅप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून अ‍ॅक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

**मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा**



फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग अ‍ॅप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणतीही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणं उत्तम.

**यूपीआय पेमेंट डीअ‍ॅक्टिव्हेट करा**

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो. त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीअ‍ॅक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

**सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा**

मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित अ‍ॅपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

**पोलिसांत तक्रार करा**

या सर्व स्टेप्स फॉलो केल्यावर पोलीस अधिकाऱ्यांना तुमच्या फोन चोरी झालेल्या डिव्हाइसची माहिती द्या. तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फोन चोरी झाल्याची तक्रार करू शकता आणि एफआयआरची प्रत त्यांच्याकडून घेऊ शकता. जर तुमच्या फोनचा गैरवापर झाला किंवा तुमच्या फोनच्या माध्यमातून पैसे चोरीला गेले तर ही कॉपी पुरावा म्हणून वापरता येईल.

# औषध घेताना घ्या काळजी!

**औषध घेण्याच्या काही विशिष्ट पद्धती असतात. जर त्या पाळल्या नाही गेल्या तर समस्या आणखी वाढू शकतात.**

▮जर तुम्ही नियमित आपल्या फॅमिली डॉक्टरकडे जात असाल आणि एखाद्या नवीन डॉक्टरकडे गेल्यास तुमची मेडिकल हिस्ट्री आणि सध्या घेत असलेल्या औषधांची माहिती त्या डॉक्टरांना अवश्य द्या. कोणत्या औषधानं अ‍ॅलर्जी होत असल्यास त्याचीही माहिती डॉक्टरांना द्या.

▮आपल्या मर्जीनं जुन्या प्रिस्क्रिप्शनवर औषधं घेऊ नये. कारण ती औषधं त्यावेळेची लक्षणं आणि आजार पाहून दिलेली असतात.

▮एखादं औषध घेतल्यावर पोट खराब होणं, स्किन इन्फेक्शन अथवा सूज आल्यास तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधा.

▮औषध रिकाम्यापोटी खायचं आहे की जेवण झाल्यानंतर खायचंय याची माहिती डॉक्टरांना विचारावी.

▮औषधाची एक्सपायरी डेट पाहावी. तारीख बरोबर असेल मात्र औषधाची अवस्था खराब असल्यास, सिल फोडलेलं असल्यास अथवा रंग खराब झालेला असल्यास ते औषध घेऊ नये.



**आजकाल केस गळणे, तुटणे, रुक्ष होणे अशा अनेक तक्रारी ऐकायला येतात. त्यावर उपचार म्हणून विविध प्रकारचे शाम्पू, तेल, कंडिशनर वापरण्याचा सल्ला दिला जातो, मात्र तरीही खूप फायदा होतो असे दिसून येत नाही. त्यामुळे आपल्या या केस समस्येचे कारण आपण वापरत असलेला कंगवा तर नाही ना याची खात्री करून घ्यायला हवी. कारण केसांच्या या तक्रारींसाठी तुम्ही वापरात असलेले प्लास्टिक अथवा धातूचे कंगवे कारणीभूत असू शकतात. या समस्येतून सुटका करून घेण्यासाठी लाकडापासून बनवले गेलेले कंगवे खूपच उपयुक्त ठरतात.**

# लाकडी कंगव्याचा वापर देईल केसांना नवसंजीवनी



भारतात फार पूर्वीपासून लाकडापासून बनवलेली फणी वापरण्याची प्रथा होती. आजही ग्रामीण भागात वृद्ध आजीबाईकडे अशी फणी सापडू शकेल. मात्र काळाच्या ओघात ही प्रथा बंद पडली. आता या फण्या कदाचित जुन्या वस्तुसंग्रहालयात पाहायला मिळतील. पण बाजारात अनेक कंपन्यांनी विविध झाडांच्या लाकडापासून बनवलेले कंगवे आणले आहेत. हे कंगवे तुमच्या केसांना नवसंजीवनी देणारे ठरू शकतात. याची अनेक कारणे आहेत.

डोक्याची केसाखालची त्वचा लाकडी कंगव्याच्या वापराने दाबली जाते. याचा फायदा डोक्यावरील अ‍ॅक्युप्रेशर पॉइंटना होतो आणि त्वचेला मसाज मिळाल्याने तेथील रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसांची मुळे घट्ट बनून केसगळती कमी होते. प्लास्टिक वा धातूचा कंगवा वापरून डोक्याला त्वचेत जे नैसर्गिक तेल असते ते समप्रमाणात पसरत नाही परिणामी केस तुटतात मात्र लाकडी कंगव्याने हे तेल एकसारखे डोक्यावर पसरले जाते त्यामुळे केस अधिक हेल्दी आणि चमकदार बनतात. अनेकांची डोक्याची त्वचा मुळातच तेलकट असते. लाकडी कंगवा हे तेल सर्वत्र पसरवतो आणि केस कमी तेलकट दिसतात.

लाकडी कंगव्याचे दात टोकदार नसतात तर थोडे बोथट असतात. त्यामुळे हा कंगवा केसातील गुंता सहज काढतो आणि केसात घर्षण कमी झाल्याने केस तुटण्याचे प्रमाण कमी होते. केसाखालची त्वचा सेन्सिटिव्ह असेल तर धातू अथवा प्लास्टिक कंगव्याने अ‍ॅलर्जी येऊ शकते तो धोका लाकडी कंगव्यामुळे राहत नाही कारण लाकूड हे नैसर्गिक आहे.



**जर आपण गरोदर असाल, तर जितकं शक्य असेल तितकं ताण–तणावापासून दूर राहा. कारण एका अभ्यासात पुढे आलंय की, गरोदर महिलेच्या ताणामुळं संबंधित हार्मोन्सचा भ्रूणाच्या विकासावर परिणाम वाईट होतो.**

# प्रेग्नेन्सीदरम्यान ताण ठेवा दूर

तणाव संबंधीच्या हार्मोन्सचा उंदरांच्या पिल्लांवर काही परिणाम होतो का? याचा शोध घेण्यासाठी गर्भवती उंदराला ग्लुकोकॉर्टिकॉइड कॉर्टिकोस्टेरॉन हॉर्मोन दिलं गेलं. त्यानंतर संशोधकांना आढळलं की, या हार्मोनमुळे त्यांची भूक खूप वाढली. मात्र त्यांचा प्लासेंटातून भ्रूणाला मिळणाऱ्या ग्लुकोजची मात्रा कमी झाली. संशोधनाचे मुख्य लेखक ओवन वाउगन म्हणाले, निष्कर्षातून ही बाब समोर आली की, आईच्या शरीरात असलेलं तणाव हार्मोन ग्लुकोकॉर्टिकॉइड भ्रूणाच्या पोषणाला नियंत्रित करतं. आईच्या शरीरात या हार्मोनची मात्रा जितकी जास्त असेल तितका परिणाम भ्रूणाच्या विकासावर होईल. गर्भाचं वजन कमी होऊ शकतं. हा अभ्यास प्रबंध 'द जर्नल ऑफ फिजिओलॉजी' या मासिकात प्रकाशित झालाय.

# सब्जा खाण्याचे गुणकारी फायदे

**तुळस भारतीय घरातील पूजनीय झाड आहे. अनेक घरांमध्ये तुळशीचं रोपटं लावलेलं पाहायला मिळतं. तुळस अनेक आजारांवर औषधी म्हणून काम करते. तुळशीचं बी म्हणजेच सब्जा शरीरासाठी अतिशय गुणकारी आहे. उन्हाळ्याच्या दिवसात सब्जाचं सेवन केल्याने शरीरात होत असलेला दाह कमी करण्यास मदत होते. सब्जा आपल्या शारीरिक विकासासोबतच मानसिक विकासासाठीही लाभदायक ठरतो. सब्जामध्ये कॅलरीज, प्रोटिन, कार्बोहायड्रेट, विटॅमिन ए, के, ई, बी, मॅंगेशियम, फायबर, कॅल्शियम आणि पोटॅशियम असतं.**

**वजन कमी करते**

सब्जा वजन कमी करण्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. सब्जामध्ये अल्फा-लिनोलेनिक अ‍ॅसिड असतं. यामुळे शरीरातील पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. सब्जामध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असतं त्यामुळे भूक नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

**बद्धकोष्ठतेचा त्रास**

बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्यास सब्जा गुणकारी ठरतो. सब्जा शरीरातील डिटॉक्सिफिकेशनच्या प्रक्रियेत मदत करते आणि पोट, पचन क्रिया सुरळीत करून आतड्यांचे कार्य चांगले ठेवते. गरम पाण्यात सब्जा भिजवून रोज रात्री दुधासोबत घेतल्याने फायदा होतो. सब्जामुळे गॅससंबंधी समस्या दूर होण्यास मदत होते. पोटातील जळजळ, अ‍ॅसिडिटी कमी करण्यासाठी मदत होते.



**त्वचा**

प्रदूषणामुळे त्वचेवर मोठा परिणाम होत असतो. परंतु सब्जा त्वचेला ठीक करण्यासाठी फायदेशीर ठरतो. नारळाच्या तेलात सब्जा भिजवून त्याने त्वचेवर मसाज करा. त्यामुळे त्वचा तजेलदार होण्यास मदत होते.

**केसांसाठी फायदेशीर**

प्रदूषणामुळे केस निर्जीव होतात. सब्जात असणारी विटॅमिन, लोह, प्रोटीन अशी पोषक द्रव्ये केसांसाठी उपयोगी ठरतात. तेलात सब्जा भिजवून लावल्याने केस चमकदार होण्यास मदत होते.

**या आजारांवर गुणकारी**

मानसिक समस्या म्हणजेच टेन्शन, डिप्रेशन, मायग्रेन यांसारख्या आजारांवर सब्जा फायदेशीर ठरतो. सब्जाच्या सेवनाने उत्साह वाटते. उन्हाळ्याच्या दिवसात पोट थंड राहते. सब्जाच्या सेवन केल्याने खाल्ल्यानंतर पोटात अ‍ॅसिडिटी कमी होते. रोगप्रतिकारशक्ती वाढते. सब्जामुळे शरीरातील टॉक्सिन दूर होतात. त्यामुळे अनेक छोट्या-छोट्या समस्या कमी होतात. शरीराला एनर्जी मिळते.

# ब्युटी प्रॉडक्ट्सपेक्षा हेल्दी डायट आवश्यक

उन्हाळ्यात घरातून बाहेर निघण्यापूर्वी सनस्क्रीन लावण्याचा सल्ला दिला जातो. उन्हात नाजूक त्वचेवर जळजळ होते आणि लाल डागदेखील पडू शकतात. अशात आज आम्ही आपल्याला असे काही उपाय सांगत आहोत ज्यामुळे त्वचेचं आरोग्य चांगले राहील आणि सौंदर्यप्रसाधने प्रॉडक्टसवर निर्भरता कमी. त्वचेच्या आरोग्यासाठी ब्युटी प्रॉडक्टसपेक्षा हेल्दी डायट अधिक आवश्यक आहे. त्वचेचं तारुण्य टिकून राहावं म्हणून प्रोटीन आणि व्हिटॅमिन सी अत्यंत आवश्यक आहे. याने त्वचेवर एक सुरक्षा परत तयार होते.

**योग्य आहार**

बीन्समध्ये झिंक आणि हायड्रोलिक अ‍ॅसिड आढळत ज्याने त्वचेत कोलाजन पातळी राखण्यास मदत मिळते. "गाजरामध्ये व्हिटॅमिन्स ए भरपूर प्रमाणात आढळतं. याचे सेवन केल्याने पिंपल्स, पुरळ यासारख्या समस्या दूर होण्यास मदत मिळते. सोबतच त्वचेत रक्त संचार योग्यरीत्या होतं.



"शाईनी स्कीनसाठी आहारात ओमेगा-३ फॅटी अ‍ॅसिड सामील करावे. मासे सेवन करणे त्वचा आणि केस दोघांसाठी फायदेशीर ठरतं.

"ब्लूबेरीमध्ये अधिक प्रमाणात अ‍ॅंटीऑक्सिडेंट्स आढळतं. ब्लूबेरीजचे सेवन केल्याने त्वचा खूप काळ सॉफ्ट राहते. याने हृदयासंबंधी तसेच कर्करोग यासारखे आजारदेखील टाळता येऊ शकतात.

"उन्हाळ्यात आपल्या आहारात लाल सिमला मिरच्या, टोमॅटो आणि स्ट्रॉबेरीज सामील करा. याने त्वचेचं आरोग्य राखण्यास मदत मिळते.

# हँड ड्रायरखाली हात सुकवणं धोकादायक, जाणून घ्या याचे कारण



**हॉटेल, थिएटरमध्ये, 'हँड ड्रायर'खाली हात सुकवणं सर्वाधिक धोकादायक असल्याचं एका संशोधनातून समोर आलंय. टॉयलेटमध्ये हँड ड्रायरमुळे हात आणि शरीरावर बॅक्टेरिया चिकटण्याची शक्यता जास्त असून तज्ज्ञ डॉक्टरांनी याला दुजोरा दिला आहे.**

विमानतळ, रेस्टॉरंट, कॉर्पोरेट ऑफिस किंवा शहरातील काही टॉयलेटमध्ये हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरचा वापर केला जातो. ओले हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरखाली काही सेकंद हात धरले जातात. त्यामुळे हात कोरडे होतात. पण अशा पद्धतीने हात सुकवणं आरोग्यासाठी घातक आहे.

अ‍ॅप्लाईड आणि इन्व्हॉयर्नमेंटल मायक्रोबायोलॉजी जर्नलमध्ये छापण्यात आलेल्या एका संशोधनानुसार, हँड ड्रायरखाली हात सुकवल्याने आपल्या स्वच्छ हातावर पुन्हा जंतू किंवा बॅक्टेरिया बसण्याची शक्यता असते. हँड ड्रायरच्या वापरामुळे हवेतील 'बॅक्टेरियल पॉथजीन्स स्पोअर्स' धारांमध्ये शिरू शकतात. ज्यामुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. हँड ड्रायरच्या वापराने हातावर अधिक बॅक्टेरिया येण्याची शक्यता असते.

टॉयलेटमध्ये असणाऱ्या हवेत फ्लोटिंग बॅक्टेरिया असतात. त्यापैकी आपण हँड ड्रायरचा वापर करतो, त्या वेळी ते बॅक्टेरिया हातावर चिकटण्याची शक्यता असते. या बॅक्टेरियामुळे अनेक आजारही होऊ शकतात, असं सेंट जॉर्ज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर गायकवाड यांनी सांगितलं.

संशोधकांनी एक प्लेट ३० सेकंद हँड ड्रायरखाली धरली. या प्लेटवर १८ ते ६० विविध बॅक्टेरिया जमा झालेले दिसले. पण हँड ड्रायरच्या आतील बाजूस मात्र कमी प्रमाणात बॅक्टेरिया होते. हँड ड्रायर बंद करून ही प्लेट दोन मिनिटे धरली. या प्लेटवर कमी प्रमाणात बॅक्टेरिया आढळून आले. ही प्लेट पुन्हा टॉयलेटमध्ये फॅन सुरू ठेवून २० मिनिटे धरण्यात आली. या प्लेटवर १५ बॅक्टेरिया सापडले. मात्र, या मशीनशिवाय आपण टॉवेल किंवा टिशू वापरू शकतो आणि या मशीनचा वापर टाळू शकतो, असा सल्ला तज्ज्ञांनी दिलाय.

# मुंबईकरांसाठी खुशखबर!

## मुंबई ते नवी मुंबई आता मेट्रोने... मेट्रो-८ला मिळाला ग्रीन सिग्नल



**कसा असेल मार्ग**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल-2 ते घाटकोपर (पूर्व) पर्यंत मेट्रो भूमिगत धावेल, तसेच घाटकोपर (पश्चिम) ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल-2 पर्यंतचा मार्ग एलिव्हेटेड असेल. या दोन स्थानकांमधील सरासरी अंतर 1.9 किलोमीटर असेल. मेट्रोसाठी 30.7 हेक्टर जमीन संपादित करावी लागेल, ज्याची किंमत अंदाजे 388 कोटी असेल. ही मेट्रो लाइन कुर्ल्यातील लोकमान्य टिळक टर्मिनससह बऱ्याच महत्त्वपूर्ण रेल्वे स्थानकांना जोडेल. याव्यतिरिक्त, त्यात इतर तीन मेट्रो मार्गासह एक इंटरचेंज देखील असेल, ज्यामुळे प्रवाशांना मोठी सुविधा मिळेल.

**■ बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाशी मेट्रोने कनेक्ट होणार असल्याचं वृत्त समोर आलं आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने या प्रकल्पाला मान्यता दिली असून त्यामुळे दोन्ही विमानतळांमधील प्रवास सुलभ होणार असल्याचं सांगितलं जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की दोन्ही विमानतळांमधील मेट्रो कनेक्शनसाठी अंदाजे २२,८६२ कोटी खर्च येईल. ही मेट्रो पीपीपी (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) मॉडेल वापरून विकसित केली जाणार असून या खर्चातील २० टक्के भाग केंद्र सरकार, २० टक्के राज्य सरकार आणि उर्वरित भाग पीपीपी ऑपरेटरचा असेल. हा प्रोजेक्ट साधारणपणे पाच वर्षांत पूर्ण करण्याचं नियोजन असलं तरी सरकारने तो तीन वर्षांत पूर्ण करण्याचे निर्देश दिल्याची माहिती आहे.

मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर कॅबिनेट पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) ओ.पी. गुप्ता, एमएसआरडीसी (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिल गायकवाड, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी प्रकल्पाचं सादरीकरण केलं.

बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं की, कोणत्याही पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन आणि सर्व प्रकारच्या परवानग्या प्रकल्प सुरू होण्यापूर्वी पूर्ण कराव्यात. बैठक संपल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं की, मुंबई आणि नवी मुंबईतील विमानतळ थेट मेट्रोने जोडले जातील. ३५ किमी लांबीची मेट्रो लाईन बांधली जाणार असून त्यामध्ये ९.२५ किलोमीटर भूमिगत आणि २४.६३६ किमी एलिव्हेटेड रोडचा समावेश आहे. या मेट्रो मार्गावर एकूण २० स्थानके असतील आणि त्यामध्ये ६ भूमिगत आणि १४ एलिव्हेटेड स्थानकांचा समावेश असेल.

**नाशिक रिंग रोडला मंजूरी**

नागपूर-गोंदिया आणि भंडारा-गडचिरोली मार्गावरील समृद्धी एक्सप्रेसवेच्या विस्तारीकरणाचे काम जलदगतीने करण्याचे आणि प्रकल्पांना विलंब न करण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले. समितीने आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर 3,954 कोटी रुपयांच्या 66.15 किमी लांबीच्या नाशिक सिटी रिंग रोड प्रकल्पालाही मान्यता दिली. खनिज वाहतूक सुलभ करण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील 85.76 किमी लांबीच्या नवेगाव मोरे-कोणसरी-मुलचेरा-हाइड्री-सुरजगड महामार्गाचे चार पदरी काँक्रीट रस्त्यावर रूपांतर करण्यासही समितीने मान्यता दिली.

# ठाणे जिल्ह्यात 'मच्छरला टक्कर' अभियान

## कीटकजन्य आजारांविरोधात जनजागृती



**भव्य चित्ररथ मोहीम**

या उपक्रमांतर्गत चार जनजागृतीपर चित्ररथांचे उद्घाटन करण्यात आले. हे चित्ररथ ठाणे शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत फिरवून नागरिकांना मलेरिया (हिवताप), डेंग्यू आणि चिकुनगुनिया यांसारख्या कीटकजन्य आजारांबाबत जागरूक केले जाणार आहे. गतवर्षी ठाणे जिल्ह्यात हिवतापाचे २,०७३ रुग्ण, डेंग्यूचे १,०९३ रुग्ण, चिकुनगुनियाचे १६८ रुग्ण आढळून आले होते. वाढत्या शहरीकरणामुळे आणि साचलेल्या पाण्याच्या समस्येमुळे हे आजार सार्वजनिक आरोग्यासमोर मोठे आव्हान ठरत असल्याचे आरोग्य विभागाने नमूद केले.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्हा आरोग्य विभागामार्फत कीटकजन्य आजार प्रतिबंधासाठी ह्यमच्छरला टक्करह्न या विशेष अभियानाची सुरुवात करण्यात आली. जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, ठाणे आणि Godrej Embed- FHI संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ प्रजासत्ताक दिनी जिल्हा पोलीस आयुक्तालयाच्या मैदानात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक डॉ. अशोक नंदापूरकर, सहाय्यक संचालक डॉ. मनीष रेंघे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या सूचनेनुसार जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे यांनी जनजागृती चित्ररथ मोहिमेची सुरुवात केली.

**हत्तीरोग प्रतिबंधक औषधांचे वाटप**

चित्ररथांद्वारे नागरिकांना घर आणि परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचू न देणे, डास प्रतिबंधक उपायांचा वापर, ताप आल्यास त्वरित वैद्यकीय तपासणी, हत्तीरोग दुरीकरणासाठी विशेष मोहीम या बाबींविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. याच कार्यक्रमात १० ते २३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान भिवंडी तालुक्यात हत्तीरोग दुरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. संतोषी शिंदे यांनी दिली. या मोहिमेत आरोग्य कर्मचारी नागरिकांच्या घरी जाऊन हत्तीरोग प्रतिबंधक औषधे देणार आहेत.

# राज्यातील आयटीआयचे आधुनिकीकरण

## पहिल्या टप्प्यात ३ आयटीआयचा समावेश... विद्यमान अभ्यासक्रमात होणार सुधारणा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण होणार आहे. योजनेच्या पहिल्या टप्पात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथील आयटीआयचे आधुनिकीकरण केले जाणार आहे तसेच नवीन अभ्यासक्रमासह विद्यमान अभ्यासक्रमातही सुधारणा करण्यात येणार आहे.

कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी पीएम-सेतू योजनेतून आयटीआयचे आधुनिकीकरण करण्याची योजना आहे. आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी हब अँड स्पोक प्रारूप विकसित केले जाणार आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च करणार आहे. यामुळे राज्यातील आयटीआयचे रूप पालटणार आहे. या आधुनिकीकरणामुळे तरुणांना विविध क्षेत्रात दर्जेदार व्यावसायिक संधी उपलब्ध होणार आहे.



**सरासरी चार अभ्यासक्रम सुरू करणार**

एका हब आयटीआयमध्ये सरासरी चार नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत तर दहा विद्यमान अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. स्पोक आयटीआयमध्ये दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत तर आठ अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. उद्योगांची संख्या कमी असलेल्या ठिकाणी सेवा क्षेत्र, बहुकौशल्य अभ्यासक्रम आणि उपजीविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

या योजनेची पुढच्या वर्षात टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेकरिता केंद्र सरकारचा ५० टक्के राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असेल.

# सातारा जिल्ह्यातील कोयना प्रकल्पग्रस्त सुविधांपासून वंचित

**■ठाणे।प्रतिनिधी,**

साडेसहा दशकांपूर्वी सातारा जिल्ह्यातील कोयना धरण प्रकल्पात बाधित झालेल्या सुमारे ८०हून अधिक कुटुंबांचे पुनर्वसन भिवंडी तालुक्यातील करंजवडे गावात करण्यात आले. मात्र गावठाण मंजुरी आणि महसुली दर्जाअभावी ही कुटुंबे सेवा-सुविधांपासून वंचित आहेत. याबाबत न्याय मिळावा यासाठी ग्रामस्थांनी आमदार संजय केळकर यांची जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात भेट घेऊन साकडे घातले. याबाबत महसूलमंत्र्यांच्या दालनात संयुक्त बैठक घेणार असल्याचे संजय केळकर म्हणाले.

सुमारे ६५ वर्षांपूर्वी कोयना धरण प्रकल्पग्रस्त ८०हून अधिक कुटुंबांचे पुनर्वसन भिवंडी तालुक्यातील करंजवडे गावात करण्यात आले आहे. मात्र या कुटुंबांच्या तीन पिढ्या सोयी सुविधांपासून वंचित असल्याची व्यथा या ग्रामस्थांनी आमदार केळकर यांच्याकडे मांडली. किमान सात एकर जागा असलेल्या गावाला महसुली दर्जा दिला जातो, परंतु करंजवडे गाव चार एकरवर असून आणखी तीन एकर जमीन गावाला मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनातून केली



आहे. महसुली गावाचा दर्जा आणि गावठाण दर्जा मिळाला नसल्याने शासनाच्या विकास योजना तसेच सोयी-सुविधांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे गेल्या ६५ वर्षांत तीन पिढ्यांचे जीवनमान ढासळले आहे. जिल्हा परिषदेची विकासकामे सुरू असून अन्य गावांना निधी मिळाला असला तरी करंजवडे गावाला निधी मिळाला नसल्याची बाब ग्रामस्थांनी संजय केळकर यांच्या निदर्शनास आणली. याबाबत आ.केळकर यांनी लवकरच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात संयुक्त बैठक आयोजित करून महसुली दर्जा आणि गावठाण मंजुरी याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले. गावाला महसूल दर्जा आणि गावठाण मंजुरीबाबत संजय केळकर यांचा मंत्रालय स्तरावर पाठपुरावा सुरू असून त्याला यश मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केला. भाजपच्या खोपट येथील कार्यालयात आयोजित जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात शुक्रवारी ठाण्यासह इतर तालुक्यांतील नागरिकही समस्यांची निवेदने घेऊन आले होते. यात बाळकुम येथील दोस्ती गृहसंकुल परिसरात वाढत्या अपघातांमुळे गतिरोधकाची मागणी, ठाणे परिवहन सेवेतील कंत्राटी कामगारांच्या समस्या, मॉडेला चेक नाका येथील कामगार कार्यालय, बेथनी रुग्णालयात रुग्णाचे बिल कमी करणे, शर्मिला सोसायटी, शिधावाटप कार्यालय, सन मोटर्स यांनी केलेली फसवणूक, विकासकाकडून झालेली फसवणूक आदी समस्यांची निवेदने प्राप्त झाली. संजय केळकर यांनी काही प्रकरणात तत्काळ संबंधितांना फोन करून त्यावर निर्णय घेतले तर काही प्रकरणांचा पाठपुरावा करून नागरिकांना न्याय मिळवून देणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात अनिल भगत, राजेश गाडे, दिपक गायकवाड, विशाल वाघ, राजेश जाधव, राजेश ठाकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# ६९ वर्षीय वृद्धाचा ९ वर्षांच्या चिमुकलीवर हिंगोलीत बलात्कार!




**■मुंबई। प्रतिनिधी,**

हिंगोली जिल्ह्यातून एक हादरवून टाकणारी बातमी समोर येत आहे. हिंगोलीतील एका ६९ वर्षीय पुरुषाने ९ वर्षीय मुलीला चॉकलेट खायला देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आहे. घाबरलेल्या मुलीने हा संपूर्ण प्रकार आईला सांगितल्यानंतर ह्या घटनेचा उलगडा झाला आहे. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे हिंगोलीत खळबळ उडाली आहे. दरम्यान, घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.

**चॉकलेट आणि पैसे देऊन केले अत्याचार**

अल्पवयीन पीडितेचे पालक आरोपीच्या शेतात रोजंदारीवर काम करतात. २८ तारखेला सकाळी ९ वर्षीय पीडिता शाळेत जात होती. त्यादरम्यान, आरोपीने तिला एकटी जाताना पाहून तिला काही चॉकलेट आणि पैसे दिले. त्यानंतर तिला घरी येण्यास सांगितले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर, घाबरलेल्या मुलीने तिच्या आईला तिच्यावर झालेला अत्याचार सांगितला. तिच्यासोबत घडलेला प्रकार ऐकून आई घाबरली.

**वडिलांनी दाखल केली तक्रार**

आईने मुलीच्या वडिलांना या अत्याचाराची माहिती दिली. त्यानंतर मुलीच्या कुटुंबाने काल रात्री कळमनुरी पोलिस ठाण्यात जाऊन आरोपी संतुकराव आवटे याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने गुन्हेगाराला अटक केली. तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली. आरोपी विरुद्ध पोक्सो आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. मुलीला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

# मुंबई महापालिका वायू प्रदूषण रोखणार

## प्रत्येक वॉर्डात मोबाईल मिस्टिंग व्हॅन, स्प्रिकलर करून धुळीचे प्रमाण कमी करणार




**अधिक दक्षतेने काम करावे** : वातावरणातील बदलांमुळे मुंबई महानगरासह मुंबई प्रदेशातील हवेच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे. परिणामी, हवेतील प्रदूषणात वाढ झाली आहे. महापालिकेने ठरवून दिलेल्या विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. विशेषतः रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी अधिक दक्षतेने कामे करण्यात यावी, असे निर्देश पालिका प्रशासनाने संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

हिवाळ्यात प्रदूषणात वाढ होण्याचा धोका अधिक असून फेब्रुवारीपर्यंत प्रदूषण नियंत्रणासाठी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. प्रदूषणाला कारणीभूत धुळीचे कण हवेत पसरू नये, यासाठी मोबाईल मिस्टिंग व्हॅनद्वारे स्प्रिकलर करत धुळीचे प्रमाण कमी करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महापालिका तब्बल २५ मोबाईल मिस्टिंग व्हॅन आणि स्प्रिकलर भाडेतत्त्वावर घेणार आहे.

मुंबईत पावसाने माघार घेतल्यानंतर ऑक्टोबर महिन्यापासून प्रदूषणात वाढ होते आणि हवेची गुणवत्ता खालावते. प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या बांधकाम ठिकाणी पालिका प्रशासनाने १०६ ठिकाणी स्टॉप वर्क नोटीस बजावली आहे. प्रदूषणात वाढ होत गेली आणि धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी मोबाईल मिस्टिंग व्हॅन भाडे तत्त्वावर घेण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. पालिकेच्या २४ विभागीय कार्यालय असून एकूण २५ मिस्टिंग व्हॅन भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# ठाकरे बंधूंविरोधात आक्षेपार्ह व्हिडीओमुळे नालासोपाऱ्यात वाद

**■वसई। प्रतिनिधी,**

नालासोपारा परिसरात समाजमाध्यमांवरील एका आक्षेपार्ह व्हीडिओमुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. एका तरुणाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात अपमानास्पद व अर्वाच्च भाषेत वक्तव्य केले होते. या व्यक्तव्याचा व्हिडिओ तयार करून त्याने तो सोशल मीडियावर पोस्ट केला होता. प्रसिद्धी आणि 'व्ह्यूज'मिळवण्यासाठी केलेल्या या कृतीमुळे त्याच्यावर तीव्र टीका होत आहे. हा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्यानंतर आणि केवळ प्रसिद्धीसाठी ही मयार्दा ओलांडली जात असल्याचे लक्षात आल्यानंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले. मनसे पदाधिकारी किरण नकाशे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी संबंधित तरुणाचा शोध घेत त्याला थेट त्याच्या राहत्या घरातून बाहेर काढले. त्यानंतर त्याला मारहाण करत त्याची अर्धनग्न अवस्थेत धिंड



काढण्यात आली. सूरज शिर्के असे या तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर सूरज शिर्केने हात जोडून ठाकरे बंधूंची माफी मागितली. तरुणाच्या या कृतींमुळे राजकीय वर्तुळात आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप दिसून येत होता. सध्या सोशल मीडियावर प्रसिद्धीसाठी कोणत्याही थराला जाऊन वादग्रस्त वक्तव्ये करण्याचे प्रमाण वाढले आहे. राजकीय नेत्यांवर टीका करताना सभ्यतेच्या आणि कायदेशीर मर्यादणकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे या घटनेतून दिसून येते. संबंधित तरुणाने केलेली पोस्ट अनेकांना आक्षेपार्ह वाटली असून त्यातूनच हा तणावपूर्ण प्रकार घडल्याचे बोलले जात आहे.

# डीजीपी सदानंद दाते यांच्या या कृतीने सुरक्षा दलाचे सैनिक अचंबित

**■मुंबई। प्रतिनिधी,**

सदानंद दाते हे महाराष्ट्रातील पोलीस विभागाचे सर्वोच्च अधिकारी आहेत. म्हणजेच ते पोलीस महासंचालक (डीजीपी) आहेत. शनिवारी (३१ जानेवारी) पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याला भेट दिली. तेव्हा तिथं एक अतिशय हृदयस्पर्शी दृश्य पाहायला मिळाले. सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर, डीजीपींनी कोणताही प्रोटोकॉल किंवा खुर्च्या ङ्म टेबलांना न जुमानता, सुरक्षा दलाच्या सैनिकांसोबत जमिनीवर मांडी घालून मोठ्या आनंदाने जेवण केले. जमिनीवर जेवण करण्याच्या त्यांच्या शैलीने तेथे उपस्थित असलेल्या सीआरपीएफ, एसआरपीएफ आणि जिल्हा पोलीस कर्मचाऱ्यांची मने जिंकलीच शिवाय त्यांचे मनोबलही वाढवले. जेवणादरम्यान, त्यांनी सैनिकांशी मोठ्या प्रेमाने संवाद साधला आणि त्यांच्या समस्या



गांभीयार्ने समजून घेतल्या.

डीजीपी सदानंद दाते यांनी त्यांच्या भेटीदरम्यान गडचिरोलीतील अत्यंत संवेदनशील भाग बिनागुंडा येथे भेट दिली. या दुर्गम भागात, त्यांनी ह्यपोलीस दादालोरा विंडोह्न अंतर्गत आयोजित केलेल्या मोठ्या मेळ्यात भाग घेतला, जिथे ५०० हून अधिक ग्रामस्थांना शेतीची अवजारे, शिलाई मशीन आणि सायकली आदी आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. आदित्य पोदारी या लहान मुलाने महाराष्ट्र गीत गाऊन डीजीपींसह सर्व अधिकाऱ्यांना मंत्रमुग्ध केले. जनतेला धीर देत डीजीपींनी सांगितले की, पोलीस केवळ सुरक्षेसाठीच नव्हे तर या भागात रस्ते, वीज आणि रुग्णालये यासारख्या आवश्यक सेवा पुरवण्यासाठीही त्यांच्यासोबत उभे आहेत.

त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी वांगेतुरी पोलीस ठाण्याच्या नवीन आधुनिक इमारतीचे उद्घाटन केले आणि पोलीस मुख्यालयात एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. कसनासूर-बोरिया चकमकीत नक्षलवाद्यांशी शौर्याने लढणाऱ्या ३१ शूर पोलिसांना त्यांनी शौर्य पदकांनी सन्मानित केले. त्यांनी उत्कृष्ट कामगिरीसाठी पाच पोलिस अधिकाऱ्यांना लवकर पदोन्नती देखील दिली. शहीद सैनिकांना श्रद्धांजली वाहताना डीजीपी म्हणाले की, अशा कठीण परिस्थितीतही आपल्या सैनिकांचा आत्मा खरोखरच प्रशंसनीय आहे आणि संपूर्ण पोलीस दलाने त्याच प्रामाणिकपणाने आणि उच्च ध्येयाने काम केले पाहिजे.

# नांदेडमध्ये १२०० रुपयांची लाज महागात पडली

## मुख्याध्यापिकेसह दोन शिक्षक एसीबीच्या जाळ्यात

**■कल्याण।प्रतिनिधी,**

नांदेड : कंधार तालुक्यातील उस्माननगर येथील जिल्हा परिषद शाळेत आयकर रिटर्न भरण्यासाठी पगाराचे विवरणपत्र मागणाऱ्या शिक्षक दांपत्याला लाच घेताना मुख्याध्यापिका व दोन सहशिक्षक रंगेहाथ अटक झाली आहे. हा प्रकार २९ जानेवारी २०२६ रोजी घडला. या प्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्याध्यापिका विद्या बळवंत वांगे (५५), सहशिक्षक रामेश्वर शामराव पांडागळे (५६) आणि गौतम जयवंतराव सोनकांबळे (५६) यांना



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले. हे सर्व उस्माननगर जिल्हा परिषद शाळेत कार्यरत आहेत. तक्रारदार दांपत्याने सन २०१९ ते सप्टेंबर २०२५ पर्यंत शाळेत शिक्षक व शिक्षिका म्हणून काम केले होते. सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांची बदली झाली. त्यांना आयकर रिटर्न भरण्यासाठी २०२५ चे पगाराचे विवरणपत्र लागल्याने त्यांनी २६ जानेवारी रोजी मुख्याध्यापिकेकडे स्टेटमेंट देण्याची विनंती केली होती. त्यावेळी प्रत्येकी ६०० रुपये अशी १२०० रुपये लाच मागितली गेली. पडताळणीत ही मागणी सत्य असल्याचे समोर आले. एसीबीने २९ जानेवारी रोजी सापळा रचला आणि तक्रारदाराने सहशिक्षक पांडागळे याच्याकडे १२०० रुपये दिले. त्यांनी ही रक्कम स्वतःसाठी आणि मुख्याध्यापिका वांगे यांच्यासाठी स्वीकारताना रंगेहाथ पकडली. तसेच सहशिक्षक सोनकांबळे यांनी लाच देण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे तीनही संशयित अटकेत आले आहेत. हा प्रकार जिल्हा परिषद शाळेत लाचलुचपत प्रतिबंधक उपाययोजनांची गरज अधोरेखित करतो.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com